क७/३४

मराठी ललित वाङ्म

वर्गीकरण

वा. पु. कोल्हटकर बी.ए., बी.टी., डिप्. लिब्.
साहायक, महाराष्ट्र ग्रंथालय, पुणें २

एन्. के. पब्लिशिंग हाउस, पुणें २

१९४७ .... किंमत एक रुपया

no 38
1948
Received on 24-10-1948
49/38

मराठी ललितवाङ्मयाचें

वर्गीकरण

क्र.
ता.

मूळ लेखक—शि. रा. रंगनाथन्, अेम्.अे., अेल्.टी., अेफ्.अेल्.अे.
मद्रास व बनारस विद्यापीठांचे माजी ग्रंथपाल,
दिल्ली विद्यापीठाचे ग्रंथपालनाचे प्राध्यापक,
मद्रास ग्रंथालय संघाचे कार्यवाह,
भारतीय ग्रंथालय संघाचे अध्यक्ष

अनुवादक—वासुदेव पुरुषोत्तम कोल्हटकर
बी.अे., बी.टी., डिप्.लिब्.
माजी ग्रंथपाल, नू. म. वि. हायस्कूल, पुणें २
महाराष्ट्र ग्रंथालय, पुणें २

किंमत अेक रुपया

अेन्. के. पब्लिशिंग हाअुस, पुणें २
डिसेंबर १९४७

अनुक्रमणिका

या पुस्तकांत योजलेला अेक विशेष महत्त्वाचा व प्रत्येक ग्रंथालयांत हरघडी वापरावा लागणारा शब्द—**स्थानांक**—

ग्रंथालयाच्या अेकंदर संग्रहांत प्रत्येक पुस्तकाची अेकच अेक ठरीव जागा असते. ती प्रत्येक पुस्तकाची त्याच्या मार्गे ठेवण्याच्या व त्याच्यापुढें ठेवण्याच्या पुस्तकांचेमधील नात्यानुसारी जागा ज्या ठराविक चिन्हानें दाखवावयाची त्याला इंग्रजींत Call number असें म्हणतात. मराठींत त्यास स्थान दाखविणारा **स्थानांक** म्हणतात.

२०३/३४

अनुवादकाचें निवेदन

ग्रंथपालनशास्त्र किंवा ग्रंथालयशास्त्र या विषयावर मराठींत आतां-पर्यंत फर्ग्युसन कॉलेजचे ग्रंथपाल रा. रघुनाथ शतानंद पारखी यांचें अेक व बडोद्याच्या पुस्तकालयखात्यानें बसविलेल्या पद्धतीचें रा. कुडाळकर यांचें अेक अशीं दोनच तांत्रिक विवेचनाचीं पुस्तकें आहेत. या शास्त्राची माहिती मिळविणारांकरितां यापुढें अनेक पुस्तकें तयार होणें जरूर आहे. कारण प्राथमिक व माध्यमिक शाळा, सार्वजनिक ग्रंथालयें, महाविद्यालयें, संशोधन-संस्था, वृत्त-पत्रें यांचे चालक या शास्त्राकडे साशंकतेंतून हळूहळू बाहेर पडून थोड्याशा कार्योत्सुकतेनें पाहूं लागले आहेत. ग्रंथपालनाच्या अभ्या-साकडे व परीक्षेकडेही उच्चशिक्षण घेतलेले पदवीधर, कांहींजण निष्काम–(रिकामा वेळ घालविण्याच्या–असा अर्थ केला तरीही फारसें चुकणार नाहीं) वृत्तीनें तर कांहीं ‘ भावीकाल फलदायक होईलही ’ या अपेक्षेनें वळत आहेत. महाराष्ट्रांत हा बदल घडून येण्यास बडोद्याचे कै. श्रीमंत सयाजीराव महाराज व त्यांनीं सुरू केलेलीं सार्वजनिक ग्रंथालयें, केसरीचे कै. तात्यासाहेब केळकर व त्यांनीं सुरू केलेली केसरी-मराठा ही वृत्तपत्रीय ग्रंथशाळा, नू. म. वि.चे गु. प्राचार्य ना. ग. नारळकर व त्यांच्याही आधींचे गु. म. म. प्रा. पोतदार वगैरे मुख्याध्यापक यांनीं वाढविलेलें नू. म. वि. हायस्कूलचें शालेय ग्रंथालय, अनेकांच्या प्रयत्नांनीं टिकलेलें मुंबईचें मराठी ग्रंथसंग्रहालय हें निवळ मराठी अभ्यासकांची सोय करणारें सार्वजनिक ग्रंथालय, भव्य इमारतीचे दृष्टीनें वाढलेलें पुण्याचें नगर वाचन मंदिर, अनाथ विद्यार्थी गृहाचे आचार्य वि. गं. केतकर व त्यांचें

पर्वतीवाचनालय इत्यादि व्यक्ती व संस्था निस्संशय कारणीभूत आहेत.

ग्रंथालयांसंबंधीं अगदीं आतां आतां नव्यानें थोडा जोराचा विचार सुरू झाला आहे. मुंबई प्रांताचे **पंतप्रधान श्री. बाळासाहेब खेर** हे अग्रगण्य विद्वान् व अधिकारी ग्रंथालयांना सार्वजनिक शिक्षणप्रसाराचें उत्कृष्ट साधन म्हणून हातांत घेत आहेत. अशा या ग्रंथालयांना अनुकूल बनत चाललेल्या वेळीं मराठी ललित-वाङ्मयाच्या वर्गवारीस मार्गदर्शक होणारें हें पुस्तक ग्रंथालयें व ग्रंथ-पाल यांचेकरितां पुढें येत आहे. अखिल हिंदुस्थानांतील उच्चशिक्षि-तांस ग्रंथालयाचा प्रभावी महिमा पटवून देण्यास झटत असलेले रावसाहेब रंगनाथन् रामामृतम् शियाळीकर म्हणजेच अेस्. आर्. रंगनाथन् यांच्या पुस्तकाचें हें भाषांतर आहे. भाषांतर करतांना परिभाषेची अडचण पदोपदीं आली. ती ठरवितांना भाषापंडित गो. कृ. मोडक, प्रा. डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे, नवीन मराठी ग्रंथ-सूचीचे कर्ते व कोलनपद्धतीच्या इंग्रजी वर्णांना मराठी प्रतिवर्ण शोधून काढणारे शंकर गणेश दाते (हे वर्ण या पुस्तकांत दिले आहेत), प्रा. रा. शं. वाळिंबे, प्रा. नी. शं. नवरे, फर्ग्युसनचे र. श. पारखी यांचेशीं अनेकवार ऊहापोह केला. अर्थवाहक होतील असे रूढ शब्दच होतां होई तों निवडले. ते उपयोगांत येतीलसे वाटल्यानंतरच या पुस्तकांत वापरले आहेत. कठिण परिभाषेनें शास्त्राकडे दुर्लक्षच होण्याचा संभव आहे. म्हणून कठिणता न येऊं देण्याचा शक्य तेवढा प्रयत्न केला आहे.

भाषांतर करण्याची आज्ञा केल्याबद्दल गुरुवर्य रंगनाथन् यांचा व पुस्तक प्रकाशिल्याबद्दल श्री. वि. दामले यांचा मी आभारी आहें.

९।१२।४७ **वा. पु. कोल्हटकर**

मराठी ललितवाङ्मयाचें वर्गीकरण

प्रकरण १ लें

मराठी वाङ्मय

मराठींत जें जें लिहिलें गेलें, तें तें सर्व म्हणजे 'मराठी वाङ्मय' या स्थूल अर्थानें या लहानशा पुस्तकांत, हे शब्द योजलेले नाहींत. रससौंदर्य वा रचनासौंदर्य या विशेषांमुळें ज्याचा स्वतंत्र विचार करावयास पाहिजे तें तें मराठींतील लेखन या मर्यादित अर्थानें हे शब्द वापरले आहेत. या अर्थानें आलेलें परंपरागत वाङ्मयप्रकार म्हणजे 'काव्य', 'नाट्य', 'कथा-कादंबरी' आणि 'गद्य' हे होत.

या वाङ्मयप्रकारांची व्याख्या केली म्हणजे वाङ्मय या शब्दाला घातलेली ही मर्यादा अधिक स्पष्ट होईल. उदाहरणार्थ, काव्य म्हणजे गेय किंवा वृत्तबद्ध भाषेंत केलेलें लेखन वा अशीच एखाद्या नमुन्याप्रमाणें केलेली रचना. काव्यांत नेहमीं निवडक व डौलदार शब्द असतात, अलंकार योजतात आणि आपली रोजची भाषा किंवा गद्यलेखन यांच्या ठरीव वाक्यरचनेहून कमीअधिक प्रमाणांत वेगळी वाक्यरचना असते. या अर्थानें काव्याचा अगदीं साधा प्रकार म्हणजे श्लोक असें म्हणतां येईल. परंतु प्रत्येक श्लोकबद्ध लेखनाची काव्यांत वर्गवारी करतां येत नाहीं. अंकगणितावरील एखादें पुस्तक जरी पद्यमय भाषेंत लिहिलें असलें तरी त्याची वर्गवारी काव्यांत न करतां अंकगणितांतच करावयाची असते. म्हणून

कोणतेंही तांत्रिक विवेचनाचें वा शास्त्रीय माहितीचें पुस्तक जरी श्लोकबद्ध असलें तरी तें काव्यप्रकारांत मोडूं नये याकरितां त्याचा हेतु ध्यानांत घेऊन काव्याचीं लक्षणें निश्चित केलेलीं आहेत. उदात्त मनोहारि विचार, कल्पना तसेंच भावना यांचें चित्रण म्हणजेच काव्य. काव्याची भाषा अर्थात् त्यास अनुरूप असते. आणि तिच्यांत योजलेले शब्द किंवा शब्दप्रयोग यांतील ध्वनितार्थ व सूचकता यांनीं वर उल्लेखिलेले विचार, कल्पना व भावना हीं तिन्हीं एकदमच उद्दीपित होतात.

गद्य या वाङ्मयप्रकाराचें कार्य काव्यासारखेंच असतें. त्यास वृत्तबद्धता नाहीं एवढाच फरक.

कथा-कादंबरी या वाङ्मयप्रकाराचा विशेष हा कीं त्यांत केवळ कल्पित घटनांचें वर्णन आणि कल्पित व्यक्तींचें चित्रण असतें. यांत गोष्टी व कादंबऱ्यांचा अंतर्भाव होतो.

नाट्य म्हणजे रंगभूमीवरील अभिनयास अनुरूप अशी गद्य वा पद्यमय रचना. नाट्यांत संवाद व अभिनय यांचेद्वारां खऱ्याखुऱ्या जीवनांत आढळतात तसे अंगविक्षेप, पोषाख व देखावे यांचे साहाय्यानें गोष्ट सांगितलेली असते.

प्रकरण २ रें

ग्रंथालयीन वर्गीकरणाचें शास्त्र

आतां आपण ग्रंथालयीन वर्गीकरणाचें कार्य व स्वरूप स्थूलमानानें पाहूं. म्हणजे मराठी वाङ्मयाच्या वर्गवारीस त्याचा वैशिष्ट्यानें कितपत उपयोग होतो तें दिसून येईल.

२१ ग्रंथालयीन वर्गीकरणाचा हेतु

वर्गीकरण हें आपलें साध्य नाहीं. तें केवळ एक साधन आहे. ग्रंथांचा प्रसार जास्त व्हावा आणि उपयोग सुलभ व्हावा हें आपलें साध्य म्हणजे हेतु आहे. प्रत्येक वाचकास हवें असलेलें पुस्तक चटकन् मिळावें, प्रत्येक पुस्तक वाचकांच्या नजरेस पडावें, तसेंच वाचकाचा आणि ग्रंथालय व्यवस्थापकांचा वेळ वांचावा —या गोष्टी ग्रंथालयांत महत्त्वाच्या आहेत. ग्रंथालयशास्त्राचीं सूत्रेंही हेंच करावयास सांगतात, आणि म्हणून ग्रंथालयीन तंत्रानें हेंच साध्य करावयाचें असतें. हें साध्य करण्याकरितां मुक्तद्वार योजना, विभागांच्या चिठ्या, ग्रंथसूचि इत्यादि विविध गोष्टी उपयोजिल्या जातात. अशांतलीच एक गोष्ट म्हणजे **पुस्तकांची सोईवार स्थानव्यवस्था. ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे.** इतर सर्व गोष्टी आणि त्यांतील मुख्य म्हणजे संदर्भशोध हीं स्थानव्यवस्थेवर अवलंबून आहेत. ही व्यवस्था अतिशय सोपी असली पाहिजे. वाचकांनीं पुस्तकें चाळतांचाळतां त्यांची कितीही हलवाहलव केली किंवा वेळोवेळीं कितीही नव्या पुस्तकांची त्यांत भर टाकली तरी ही व्यवस्था अढळ राहिली पाहिजे. एकदां ठरविलेली ग्रंथव्यवस्था कायम टिकविणें हें वर्गीकरणाच्या शास्त्रावर आधारलेलें आहे.

२२ ग्रंथपालनशास्त्रांत गृहीत धरलेली गोष्ट

ग्रंथवर्गीकरणाच्या शास्त्रांत एक गोष्ट अगदीं मुळांतच गृहीत धरलेली आहे. ती ही—

वाचकांच्या दृष्टीनें वर्गवार म्हणजे विषयवार ग्रंथव्यवस्था ही सर्वांत सोईची आहे. लेखकवार रचना ही विषयवार रचनेहून गौण आहे. तेव्हां लेखकांच्या नांवाच्या आद्याक्षरांनुसार किंवा दुसऱ्या

एखाद्या तत्त्वानुसार केलेल्या ग्रंथव्यवस्थेपेक्षां वर्गवार म्हणजेच विषयवार व्यवस्था निश्चित करणें जरूर आहे. पुस्तकांची त्यांच्या विषयानुसार स्थानव्यवस्था करण्याचे अगोदर **ग्रंथविषयासंबंधींच्या** आपल्या कल्पना स्पष्ट व लख्ख करून घेतल्या पाहिजेत.

२३ विवक्षित विषयाचा संकेत

अनुभवानें असें सिद्ध झालेलें आहे कीं 'ग्रंथविषय' याची ठोकळ अर्थानें व्याख्या करून चालत नाहीं.

उदा. १. गंगाधर बाळकृष्ण सरदारकृत 'अर्वाचीन मराठी गद्याची पूर्वपीठिका, १८०० ते १८७४' चा विषय म्हणून 'वाङ्मय' किंवा 'मराठी वाङ्मय' किंवा 'मराठी वाङ्मयाचा इतिहास' असाही घेऊन चालणार नाहीं. 'मराठी वाङ्मयाचा १८७४ पर्यंतचा इतिहास' असाच विषय घेणें जरूर आहे. हा त्याचा विवक्षित विषय होय.

उदा. २. धोंडो बाळकृष्ण सहस्रबुद्धेकृत 'एकनाथ महाराजांचें चरित्र (१८८३)' घ्या. 'वाङ्मय' आणि 'एकनाथ' किंवा असेंच दुसरें कोणतेंही विषयनाम फार स्थूल व पुस्तकांतील मजकुरापेक्षां अधिक व्याप्तीचें होईल. 'एकनाथाचें चरित्र' हाच त्याचा नेमका समव्याप्तीचा विषय आहे; आणि म्हणून हाच त्याचा विवक्षित विषय म्हणून मानणें भाग आहे.

उदा. ३. याचप्रमाणें वासुदेव बळवंत पटवर्धनकृत 'तुकारामाच्या अभंगांची चर्चा' याचा विवक्षित विषय म्हणून 'तुकारामावरील टीका' असा घेतला पाहिजे.

उदा. ४. हरि नारायण आपटेकृत 'मी' घेऊं. 'वाङ्मय', 'मराठी कादंबरी' वा 'हरि नारायण आपटे' हा किंवा असे

विषय विवक्षित विषयाहून अतिव्याप्तीचे होतील. 'मी' ही एक मान्यता पावलेली कादंबरी आहे आणि ती स्वतःच एक विवक्षित विषय झालेली आहे.

उदा. ५. गोपाळ विष्णु तुळपुळेकृत "हरिभाऊंचा 'मी' ('मी' ह्या कादंबरीचा सविस्तर रसास्वाद)" ह्या पुस्तकाचा 'मी' हाच विवक्षित विषय नाहीं कारण त्याचा विषय अल्पव्याप्तीचा आहे. 'मीवरील टीका' असाच त्याचा विवक्षित विषय घेतला पाहिजे. कारण फक्त हाच विषय त्यांतील मजकुराशीं नेमका समव्याप्तीचा आहे.

उदा. ६. श्रीकृष्ण केशव क्षीरसागरकृत 'व्यक्ति आणि वाङ्मय' घेऊं. 'वाङ्मय', 'मराठी वाङ्मय' आणि 'मराठी वाङ्मयावरील टीका' हा किंवा असे विषय पुस्तकाच्या मजकुरापेक्षां अतिव्याप्तीचे आहेत. कारण पुस्तकाचा विषय 'तंत्रबद्ध टीका' हा आहे. आणि त्याच्या क्षेत्रांत मराठींतील असे कांहीं लेखक आहेत कीं त्यांचेपैकीं सर्वांत लहान १८९९ त जन्मलेला व यशवंत हें टोपण नांव असलेला आहे. तेव्हां त्याचा विवक्षित विषय 'ज्यांचेपैकीं सर्वांत लहान १८९९ त जन्मला, अशा मराठी ललित लेखकांवरील टीका' हा घ्यावा लागतो.

प्रकरण ३ रें

ग्रंथवर्गीकरणाच्या तंत्राचे सिद्धांत

३१ पहिला सिद्धांत

ग्रंथवर्गीकरणाच्या तंत्रांतील पहिला सिद्धांत हा—

ग्रंथांची स्थानव्यवस्था त्यांच्या विवक्षित विषयानुसार झाली पाहिजे.

याचा अर्थ हा कीं एका विवक्षित विषयाचीं पुस्तकें, दुसऱ्या कोणत्याही विवक्षित विषयाचें पुस्तक त्यांत न येऊं देतां, सर्व एकत्र ठेवावीं. ह्या सिद्धांताचीं विशेष प्रतिपादक उदाहरणें पुढीलप्रमाणें. हीं उदाहरणें कलम २३ मधील उदाहरणांशीं संबद्ध आहेत.

उदा. १ मराठी वाङ्मयाचे १८७९ पर्यंतचे सर्व इतिहास, त्यांचा लेखक वा भाषा वा प्रकाशनवर्ष कोणतेंही असो, एकत्र ठेवले पाहिजेत.

उदा. २. लेखक वा भाषा वा प्रकाशनवर्ष कोणतेंही असो, एकनाथाचीं सर्व चरित्रें एकत्र ठेवलीं पाहिजेत.

उदा. ३. लेखक वा भाषा वा प्रकाशनवर्ष कोणतेंही असो, तुकारामावरील सर्व टीकाग्रंथ एकत्र ठेवले पाहिजेत.

उदा. ४. 'मी' च्या सर्व आवृत्त्या आणि भाषांतरें, उपरोक्त तिन्ही कांहींही असोत, एकत्र ठेवलीं पाहिजेत.

उदा. ५. 'मी' वरील सर्व टीका एकत्र ठेवल्या पाहिजेत.

उदा. ६. मराठी वाङ्मयाच्या ज्या टीकाग्रंथांत १८९९ पर्यंत जन्मलेल्या लेखकांचा परामर्ष घेतलेला आहे असे सर्व ग्रंथ, त्यांचे लेखक वा भाषा वा प्रकाशनवर्ष कोणतेंही असो, एकत्र ठेवले पाहिजेत.

३२ दुसरा सिद्धांत

पहिल्या सिद्धांतामुळें पुस्तकें, आपापल्या विवक्षित विषयांनुसार गटागटांनीं एकत्र येतील. तेव्हां हें उघड आहे कीं जेवढे म्हणून विवक्षित विषय आहेत तेवढे गट तयार होतील. आतां प्रश्न उपस्थित होतो तो असा—या गटांची कोणत्या क्रमानें स्थानव्यवस्था करावी? वेगळ्या शब्दांत म्हणावयाचें तर, विवक्षित विषयांची एकमेकाशीं कोणत्या क्रमानें व्यवस्था असावी? ग्रंथवर्गीकरणाच्या तंत्रांतील दुसऱ्या सिद्धांतानें या प्रश्नाचें उत्तर मिळतें. तें हें—

विवक्षित विषयांची स्थानव्यवस्था **परस्परांच्या नात्यानुसारी क्रमानें** झाली पाहिजे.

'नात्यानुसारी क्रमानें' म्हणजे विवक्षित विषयांच्या एकमेकांशीं असलेल्या नात्यास अनुसरून ठरणाऱ्या क्रमानें. फार गाढ व गहन अर्थाचा असा हा संकेत आहे. स्थूलमानानें 'नात्यानुसारी क्रम' याची व्याख्या करणें कठिण आहे. फार तर दोन विवक्षित विषयांपैकीं अगोदर कोणता यावा हें सांगणारे कांहीं नियम ठरवितां येतील. असे कांहीं नियम—

नियम १. दोन विवक्षित विषयांपैकीं एक जर दुसऱ्याचा पोटवर्ग असेल तर त्यांपैकीं अधिक व्याप्तीचा अगोदर येईल

उदा. 'मराठी काव्य' च्या अगोदर 'मराठी वाङ्मय' येईल.

नियम २. दोन विवक्षित विषयांपैकीं एक आधींच्या कालक्रमासंबंधीं असेल तर तो अगोदर येईल.

उदा. १. सरदारकृत 'अर्वाचीन मराठी गद्याची पूर्वपीठिका' याच्या नंतर मंगेश कमलाकर नाडकर्णीकृत Short History of Marathi Literature येईल. कारण पहिल्यांत १८७० च्या

सुमारापर्यंतचाच इतिहास आला आहे. आणि दुसऱ्यांत १९२०च्या सुमारापर्यंतचा आला आहे.

उदा. २. एकनाथानंतर तुकाराम येईल. कारण पहिला १५३३ त आणि दुसरा १६०८ त जन्मला.

उदा. ३. हरिभाऊंच्या एकूण २२ कादंबऱ्या आहेत. त्यांपैकीं पहिली ' मधली स्थिति ' ही होय. ती १८८५ त प्रकाशित झाली. आणि ' मी ' ही नंतर कित्येक वर्षांनीं म्हणजे १९१६ त पुस्तकरूपांत प्रसिद्ध झाली. तेव्हां पहिली आधीं येईल.

नियम ३. दोन विवक्षित विषयांचें मूळ एकच असेल तर त्यांपैकीं कालक्रमानें पहिला असलेला अगोदर येईल.

उदा. गोपाळ विष्णु तुळपुळ्यांचें पुस्तक ' हरिभाऊंचा मी ' हें आधींच अस्तित्वांत आलेल्या ' मी ' वर आधारलेलें आहे. तेव्हां दुसरें म्हणजे ' मी ' हें पहिल्याच्या म्हणजे ' हरिभाऊंचा मी ' च्या अगोदर येईल.

नियम ४. दोन विवक्षित विषयांपैकीं एक जर अगदीं आधारभूत आणि अमूर्त (म्हणजेच नियमांचें दिग्दर्शन करणारा) असेल आणि दुसरा त्यावर आधारलेला सिद्ध विषय असेल तर त्यांपैकीं पहिला दुसऱ्याच्या अगोदर येईल.

उदा. श्री. के. क्षीरसागरांच्या ' व्यक्ति आणि वाङ्मया ' चे अगोदर केशव नारायण वाटव्यांचा ' रसविमर्श ' येईल. कारण दुसऱ्याचें लक्ष मराठी वाङ्मयाच्या टीकेच्या तंत्रावर केंद्रित झालेलें आहे तर पहिल्यांत या तंत्राचा कांहीं शेलक्या लेखकांबाबत उपयोग केला आहे.

नियम ५. एक विवक्षित विषय जर मूळ आधारात्मक असेल आणि दुसऱ्या एखाद्याचा तो जर संदर्भ ग्रंथ म्हणून उपयोगी येत असेल तर तो अगोदर येईल.

उदा. एखाद्या लेखकाच्या पुस्तकांचे आधीं त्याच्या पुस्तकांची सूचि वा संग्रह वा चरित्र येईल.

नियम ६. ज्या विवक्षित विषयांना वर उल्लेखिलेल्या नियमां-सारखे नियम लागू करतां येणार नाहींत ते, जर एखादा व्यवस्था-क्रम रूढ असेल तर त्या रूढ क्रमाप्रमाणें येतील वा कोणत्याही स्वतंत्रक्रमानें येतील.

उदा. काव्य, नाट्य, कथा आणि गद्य हे वाङ्मयप्रकार एकदां ठरवून टाकलेल्या क्रमानें—काव्य, नाट्य, कथा आणि गद्य असे येतात.

३३ तिसरा सिद्धांत

वाचकांकडून किंवा त्यांचेकरितां पुस्तक त्याच्या स्थानावरून वारंवार बाहेर पडतें. प्रत्येक वेळीं तें परत स्थानावर ठेवतांना मूळा-पासून तें पाहणें व त्याचा विवक्षित विषय ठरविणें आणि त्याचें इतर विवक्षित विषयांमधील नेमकें नात्यानुसारी स्थान ठरविणें या कामाकरितां फार विद्वान् माणसाची गरज लागेल. आणि त्यालाही तें अगदीं त्रासदायक व वेळ मोडणारें वाटेल. तसेंच त्याचें मत स्वतःशीं व इतरांशींही सुसंगत राहीलच असें नाहीं. शिवाय मोठ्याशा ग्रंथालयांतून पुस्तकें परत स्थानावर ठेवण्याच्याच कामा-करितां बरेच लोक नेमावे लागतील. ही नुसती अव्यवहार्यच नव्हे तर गैरहिशेबी गोष्ट होईल. नवीं पुस्तकें कपाटांत लावणें व बाहेर काढलेलीं पुस्तकें पुन्हा स्थानीं ठेवणें हीं कामें खरोखरी दुय्यम

साहायकांवर आणि कमी शिक्षितांवरही सोंपविणें शक्य झालें पाहिजे. एखाद्या मोठ्या ग्रंथालयांतही ग्रंथव्यवस्था नेमकी ठेवण्याचें काम रोज तास दोन तासच खर्चून अशा एखाद्या दुय्यम साहायकाला करतां आलें पाहिजे. पुस्तकांचें नात्यानुसारी स्थान ठरविण्याकरितां तीं वाचण्याची गरज उरली नाहीं व त्याऐवजीं एखाद्या ठोकळ युक्तीचा उपयोग करतां आला तरच हें शक्य होईल. यावरून ग्रंथवर्गीकरणाच्या तंत्रांतील तिसरा सिद्धांत निघतो—

विवक्षित विषयांचा व पुस्तकांचा नात्यानुसारी स्थानक्रम यंत्रासारखा सुरळित ठरला पाहिजे.

३४ चौथा सिद्धांत

ग्रंथवर्गीकरणाच्या तंत्रांतील चौथा सिद्धांत नकारात्मक आहे तो असा—

विवक्षित विषयांची त्यांच्या नांवांच्या अकारवारीनें केलेली व्यवस्था ही त्यांची नात्यानुसारी स्थानव्यवस्था सुरळित ठरविण्यांत उपयोगी होत नाहीं.

हा नकारात्मक सिद्धांत स्पष्ट करण्यास एकच उदाहरण पुरेसें होईल. उपरोक्त विवेचनांत उदाहरणार्थ घेतलेले बारा विवक्षित विषय त्यांच्या नांवाच्या अकारवारीनें पुढील क्रमानें येईल—

१ आपटे (हरि नारायण)
२ एकनाथ
३ एकनाथाचें चरित्र
४ ज्यांचेपैकीं सर्वांत लहान १८९९ त जन्मला अशा मराठी ललित लेखकांवरील टीका
५ तुकाराम

६ तुकारामावरील टीका
७ मधली स्थिति
८ मराठी कादंबरी
९ मराठी वाङ्मयाचा १८७४ पर्यंतचा इतिहास
१० ,, ,, १९२० ,, ,,
११ मी
१२ मी वरील टीका

या बारा विवक्षित विषयांच्या परस्पर नात्याकडे पहातां ही व्यवस्था खरोखरी चुकीची आहे. वस्तुस्थिति पहातां हे विवक्षित विषय त्यांच्या परस्पर नात्याचा मुळींही विचार न होतां अकारवारीमुळें इतस्ततः फेंकले गेले आहेत असें दिसतें आणि यांत तारतम्य सुटलें आहे असें म्हणणेंही अतिशयोक्तीचें होणार नाहीं.

दुसऱ्या सिद्धांताप्रमाणें या बारा विवक्षित विषयांची नात्यानुसारी स्थानव्यवस्था पाहिजे ती अशी—

१ मराठी वाङ्मयाचा १८७४ पर्यंतचा इतिहास
२ ,, ,, १९२० ,, ,,
३ एकनाथाचें चरित्र
४ एकनाथ
५ तुकाराम
६ तुकारामावरील टीका
७ मराठी कादंबरी
८ आपटे (हरि नारायण)
९ मधली स्थिति
१० मी

११ मी वरील टीका

१२ ज्यांचेपैकीं सर्वांत लहान १८९९ त जन्मला अशा मराठी ललित लेखकांवरील टीका.

नात्यानुसारी व्यवस्थेकरितां अकारवारीच्या व्यवस्थेकडे दुर्लक्ष करणें जरूर आहे. ही व्यवस्था विवक्षित विषयाचें नांव कोणत्याही भाषेंतलें असलें तरी त्यावर अवलंबून नाहीं. विवक्षित विषयांच्या नांवांत जे विशिष्ट शब्द योजलेले असतील त्यांवरही ती अवलंबून नाहीं—उदाहरणार्थ चरित्र म्हणावें वा जीवनचरित्र म्हणावें; स्थानव्यवस्था ही शब्दांवर अजिबात अवलंबून नाहीं.

३५ पांचवा सिद्धांत

या व्यवस्थेचें नेहमींचें साधन म्हणजे अकारवारी. पण तें निरुपयोगी ठरलें आहे. मग दुसरें कोणतें साधन आपण हातीं घेऊं शकूं? उत्तर अगदीं उघड आहे—व्यवस्था सुयंत्र करण्याकरितां उपयोगिलेलें दुसरें प्रचारांतील साधन म्हणजे 'अनुक्रमांक'. त्याच्या नांवानेंच त्याचें कार्य अनुक्रम दर्शविण्याचें आहे हें दिसतें. याच कार्याकरितां अनेक प्रकारच्या व्यवहारांत तें उपयोगिलें जातें. तेव्हां ग्रंथवर्गीकरणाच्या तंत्रांतील पांचवा सिद्धांत ठरतो तो हा—

विवक्षित विषयांची नात्यानुसारी व्यवस्था सुयंत्र होण्याकरितां ते विषय अनुक्रमांकानें दर्शविले जावे.

३६ सहावा सिद्धांत

" ३४ कलमाच्या शेवटीं दिलेल्या बारा विषयांत १, २, ३.... १०, ११, १२ असे ओळीनें क्रमांक द्यावे. पुस्तकांच्या पाठीवर जर बिनचूक क्रमांक लिहिले तर त्यांची स्थानव्यवस्था सुयंत्र होईलच " असें कोणीही चटकन् म्हणेल. पण असे सोपे क्रमांक

आपल्या कामीं येणार नाहींत. " ग्रंथालय ही वाढती संस्था आहे " हें ग्रंथपालनशास्त्राचें पांचवें सूत्र अशा साध्या सोप्या क्रमांकांना ताबडतोब निकामी करून सोडील. कारण कांहीं काळ लोटल्यावर नवनवे विवक्षित विषय त्यांच्यामध्यें लोटावे लागतील.

उदा. १. मराठी वाङ्मयाचा १८०० पर्यंतचा इतिहास हा १ पूर्वीं ठेवावा लागेल.

उदा. २. ६ व ७ यांच्यामध्यें मराठी नाट्य ढकलावें लागेल.

उदा. ३. ९ व १० यांच्यामध्यें ' पण लक्षांत कोण घेतो ' हें लोटावें लागेल. कारण हरिभाऊंनीं तें १८९३ त प्रकाशिलें आणि मधली स्थिति १८८५ त व मी १९१६ त प्रसिद्ध केली.

जसजसें ज्ञान वाढेल आणि जसजसें ग्रंथालय वाढेल, तसतशी अशी लोटालोट असंख्य वेळां करावी लागेल. नव्यानें येणाऱ्या विवक्षित विषयांकरितां मध्यंतरीं रिकामे क्रमांक सोडण्याच्या साध्या युक्तीची जोड देऊनही साधे अनुक्रमांक लगेच वा लवकरच निरुपयोगी ठरतील. म्हणूनच ग्रंथवर्गीकरणाच्या तंत्राची सूक्ष्म विचारांतीं बसविलेल्या नव्या पद्धतीच्या अनुक्रमांकांकरितां मागणी आहे. अशा कोणत्याही दोन अनुक्रमांकांचे दरम्यान अगणित नवे विषय ढकलावे लागले तरीही त्यांचा समावेश सहज झाला पाहिजे.

अनुभवानें असें सिद्ध झालें आहे कीं या बाबतींतला सर्वोत्तम उपाय म्हणजे एक चिन्हांकित सांकेतिक भाषा बनवून तींतून असे सुसंगत अनुक्रमांक तयार करणें हाच. आपण तिला ' वर्गीकरणाची भाषा ' असें संबोधूं. तींतील अनुक्रमांकांना आपण ' वर्गांक ' असें म्हणूं. या प्रकारच्या अनुभवावरून ग्रंथवर्गीकरणाच्या तंत्रांतील सहावा सिद्धांत निघाला आहे—

पूर्वीच आलेले, आज येत असलेले व भावी काळांत येणारे तसेच ज्ञात असलेले आणि पुढें ज्ञात होणारे अशा सर्व विवक्षित विषयांची नात्यानुसारी स्थानव्यवस्था सुयंत्र करण्याकरितां त्यांच्या नांवांऐवजीं अनुक्रमांक दर्शविण्याकरितां एक चिन्हांकित सांकेतिक भाषा—वर्गीकरणाची भाषा अशी संज्ञा असलेली—जरूर आहे.

वर्गीकरणाच्या भाषेचें स्वतःचें व्याकरण, रूपसाधना, वाक्यरचना, कोश व लेखनाचे नियम असणें जरूर आहे. प्रत्येक विवक्षित विषयाचें नांव त्या भाषेंत भाषांतरित झालें पाहिजे. ही भाषांतराची क्रिया म्हणजेच वर्गीकरण आणि तिचें फळ म्हणजे विवक्षित विषयाचा वर्गांक होय. वर्गीकरणाच्या भाषेचा कोश म्हणजे तिचें कोष्टक वा पद्धति होय.

विवक्षित विषय कितीही असले तरी त्यांपैकीं प्रत्येकास वेगळा वा विशिष्ट वर्गांक दिला आणि त्या वर्गांकांप्रमाणें ते विवक्षित विषय लावल्यावर त्यांचा क्रम नात्यानुसारी राहिला म्हणजेच वर्गीकरणपद्धतीचें उद्दिष्ट सफळ झालें. यावरूनच वर्गीकरणपद्धतीची कार्यक्षमता मोजतां येते.

प्रकरण ४ थें

ग्रंथवर्गीकरणाच्या चालू पद्धती

४१ चालू सहा पद्धती

जो वर्गीकरणपद्धति बसवितो त्यास आपण वर्गपद्धतिकार असें म्हणूं व जो तीनुसार ग्रंथांची वर्गवारी करतो त्यास वर्गवारीकार असें म्हणूं. वर्गपद्धतिकाराचें काम नवीन शोधस्वरूपाचें असतें.

आणि म्हणूनच आजवर प्रचारांत आलेल्या आधुनिक स्वरूपाच्या वर्गपद्धतींची संख्या अवघी सहा आहे. त्या पुढीलप्रमाणें आहेत.

पद्धती	पद्धतीकार	वर्ष	देश
१. Decimal(दशांश)पद्धति	मेल्व्हिल डयुई	१८७६	सं.सं.अमेरिका
२. Expansive(विस्तारी),,	सी.ए. कटर	१८९१	,,
३. Congress ,,	काँग्रेस ग्रंथालय	१९०४	,,
४. Subject (विषय) ,,	जे.डी.ब्राउन	१९०६	ब्रि. बेटें
५. Colon(कोलन) ,,	शि. रा. रंगनाथन्	१९३३	हिंदुस्तान
६. Bibliographic(सूचिबद्ध),,	एच्.ई.ब्लिस	१९३४	सं.सं.अमेरिका

ह्यांपैकीं पहिल्या पद्धतीला अग्रमान मिळविणाऱ्याचे वांट्यास येणाऱ्या सर्व सुखसवलती तशाच गैरसोयी, अडचणी पत्कराव्या लागल्या. ग्रंथवर्गीकरणाच्या पद्धतींच्या संस्थापनेचें श्रेय डयूईला आहे. त्यानें जणूं नवी सृष्टि उभारली. त्याची बुद्धिमत्ता व शोधकता हीं लोकोत्तर होतीं. परंतु सत्तर वर्षांतील आधुनिक विचारांचे ओघाचे मानानें त्याची पद्धति तोटकी पडली आहे आणि आज जें हवें आहे त्याला ती सर्वथा निरुपयोगी ठरली आहे. आणखी मुळांत ती अमेरिकेपुरती म्हणून बसविली होती आणि पौर्वात्य संस्कृतीचे-बाबत तसेंच हिंदुस्थानाबाबत ती उपयोगी पडण्यासारखी नाहीं.

एक्स्पान्सिव्ह आणि सब्जेक्टपद्धती पुढें चालूं ठेवल्या गेल्या नाहींत. पण त्यांचे ठायीं कित्येक नवीन विशेष होते. त्यामुळें नंतरच्या पद्धतींना मार्ग सांपडला.

कॉंग्रेस-पद्धति एका राज्ययंत्रानेंच संभाळलेली आहे. यामुळें जरी तिला स्थिरता व सत्ता दोन्हीही प्राप्त झालीं असलीं तरी ती कोणा एका व्यक्तीकडून बसविली गेली नसल्यामुळें तदनुषंगिक सर्व दोष

तिचेमध्यें आहेत. तिच्या अनुक्रमांकांत नव्यानें येणाऱ्या अगणित क्रमांकांना जागा नाहीं. हा अत्यंत मोठा दोष आहे. ही पद्धति सामुदायिक रीतीनें तयार केली गेल्यामुळें एका विशिष्ट व्यक्तीच्या अभिजात विचारांचा फायदा तिला मिळालेला नाहीं आणि म्हणून अवडंबरी रचनेचे सर्व दोष तींत उतरले आहेत. स्वयंप्रेरणा, शक्ति आणि सुसूत्रता यांचा तींत सर्वथा अभाव आहे. यामुळें तिचीं बाडेंच्याबाडें झालेलीं आहेत.

शेवटच्या दोन पद्धतींत पुष्कळसें साम्य आहे. कारण त्या दोन्ही एकाच गोष्टीमुळें अस्तित्वांत आल्या आहेत. डेसिमल-पद्धतीचा जीर्णोद्धार तींतील कांहीं चिह्नदोषांमुळें अशक्य झाला आहे. डेसिमल कोष्टकाची फाजील वाढ आणि कॉंग्रेस-पद्धतींतील चिह्नांचा जुनाटपणा या ह्या दोन गोष्टी होत.

डयूईनें प्रचारांत आणल्यापासून वर्गीकरणाविषयींच्या विचारांत कोणती प्रगति झाली आहे हें कोलन आणि डेसिमल-पद्धतींच्या तुलनेनें समजेल. वर्गीकरणाच्या पद्धती म्हणजे सांकेतिक भाषा होत, ही दृष्टिच प्रगति दाखविते. ह्या संकेतावरून ह्या दोन पद्धतींतील मुळांतच असलेला फरक स्पष्ट होतो.

४२ कोलन आणि डेसिमल या भाषांची तुलना

डेसिमल-पद्धति हें पुस्तक डेसिमल भाषेच्या शब्दकोषासारखें आहे. शिवाय त्यांत जेवढ्या विवक्षित विषयांचे डेसिमल क्रमांक देतां येतील तेवढे दिलेले आहेत. हें एखाद्या मराठी-इंग्रजी शब्दकोशांत जितक्या मराठी वाक्यांचें भाषांतर देतां येईल तितकें देण्यासारखें आहे. पण कोणताही मराठी-इंग्रजी कोश साधारणतः असें करीत नाहीं. आणि इंग्रजी प्रतिशब्दच त्यांत येतात. या दोन्ही

भाषांच्या व्याकरणाचें ज्ञान मिळविणें आणि मराठी-इंग्रजी शब्द-कोशाच्या साहाय्यानें मराठी वाक्यांचें इंग्रजी भाषांतर करणें हें भाषांतरकाराचें काम आहे.

कोलन-पद्धति या पुस्तकाच्या पहिल्या भागांत कोलन भाषेचें व्याकरण आणि दुसऱ्या भागांत शब्दकोश दिलेला आहे. डेसिमल-पद्धतीहून हें वेगळें आहे. शिवाय या शब्दकोशाच्या भागांत कोण-त्याही विवक्षित विषयांचे तयार कोलन क्रमांक दिलेले नाहींत. वाक्यांतील शब्दांशीं समानार्थक असे कांहीं मूलभूत संकेतांचे कोलन भाषेंतील पर्यायच त्यांत दिले आहेत. जसें वाक्य हें शब्दांचें बनलेलें असतें, तसें विवक्षित विषयाचें नांवही कांहीं मूलभूत संकेतांच्या संज्ञांचें बनलेलें असतें.

या विशेषामुळें कितीतरी नवीन विवक्षित विषयांचे योजून सांगतां येतील त्यांहून अधिक, मोजून सांगतां येतील त्यांहून अधिक आणि डेसिमल-पद्धतीनें बनवितां येतील त्यांहून अधिक कोलन-क्रमांक आपण बनवूं शकतों.

४३ उदाहरण

उदाहरणाकरितां आपण मराठी ललित वाङ्मय घेऊं या. मराठी भाषेकरितां असलेला डेसिमल क्रमांक म्हणजे ८९१·४६· ' डेसिमल पद्धति ' या पुस्तकाच्या शेवटीं असलेल्या ५ व्या कोष्टकाचे शिरोभागीं एक टीप आहे. तीवरून आपणांस पुढील वर्ग मिळतात—

८९१·४६१	मराठी काव्य
८९१·४६२	मराठी नाटक
८९१·४६३	मराठी कथा
८९१·४६४	मराठी गद्य

पण १९४२ त प्रसिद्ध झालेली १४ वी आवृत्तीही यापुढें जात नाहीं. मराठींतील ललित वाङ्मयाचीं सगळीं पुस्तकें या चार गटांत ढकलण्यानें स्थानव्यवस्थेला कोणताच उपयोग होत नाहीं. ती व्यवस्थाही ठरत नाहीं. तरीही डेसिमल-पद्धतींतच इंग्रजींतील ललित वाङ्मयाचे बाबतींत जें केलें आहे त्या मार्गानें आपण दोन पावलें टाकूं शकतों. काव्याचे पोटवर्ग पाडून ते उदाहरणादाखल घेऊं या.

८९१·४६११	आरंभकाल	इ. स. १३५० पर्यंत
८९१·४६१२	मध्ययुगीन काल	१३५० ते १६२०
८९१·४६१३	शिवकाल	१६२० ते १७२०
८९१·४६१४	ब्रिटिश पूर्वकाल	१७२० ते १८२०
८९१·४६१५	व्हिक्टोरिआ काल	१८२० ते १९००
८९१·४६१६	आधुनिक काल	१९००–

यांपैकीं प्रत्येक गटांत आपण ८ कवींचा पृथक् निर्देश करूं शकतों. पण बाकीचे सर्व ९ व्या गटांत ढकलावे लागतात. आपण व्हिक्टोरिया-कालांतील उदाहरणें घेऊन पाहूं.

८९१·४६१५१ हंसराजस्वामी १७९८ ते १८५५
८९१·४६१५२ दसरदार (विठोबाअण्णा) १८१३ ते १८७३
८९१·४६१५३ चिपळूणकर(कृष्णशास्त्री हरि)१८२४ ते १८७८
८९१·४६१५४ कुंटे (महादेव मोरेश्वर) १८३५ ते १८८८
८९१·४६१५५ ओक (वामन दाजी) १८४५ ते १८९७
८९१·४६१५६ चिंतामणि पेटकर (पांडुरंग व्यंकटेश)
१८५१ ते १८७९
८९१·४६१५७ कानिटकर (गोविंद वासुदेव) १८५४ते१९१८

८९१·४६१५८ मोगरे (गंगाधर रामचंद्र) १८५७ ते १९१५
८९१·४६१५९ इतर.

शेवटच्या वर्गांत शेंकडों कवींचा समावेश करावा लागतो. त्यांचा पृथक् निर्देश करतां न आल्यानें हा वर्ग व्यवस्थेच्या दृष्टीनें तोटका ठरतो.

डेसिमल भाषेचा तुटपुंजेपणा वेगवेगळ्या स्थळीं उघड झालेला आहे. तींत आतांपर्यंत फक्त ४८ कवींचा पृथक् निर्देश होऊं शकला आहे, बाकीच्यांचा पृथक् निर्देश करतां न आल्यानें ते सर्व ढिगाऱ्यांत बसवावे लागतील. हें समव्याप्तीचे डेसिमल क्रमांक मिळालेले ४८ कवी घेतले तरीही त्यांच्या कित्येक ग्रंथांचा पृथक् निर्देश करतां येत नाहीं. हीच गोष्ट त्यांच्यासंबंधीं झालेल्या टीका, सूचि, चरित्रें इत्यादि ग्रंथांचीही. उदाहरण मोरोपंताचेंच घेऊं या. त्यांनीं लिहिलेल्या पुस्तकांचीं नांवें तसेंच त्यांच्यासंबंधींच्या पुस्तकांचीं नांवें यांचें भाषांतर ८९१·४६१४४ या एकाच डेसिमल क्रमांकांत होईल. आणि हा यांपैकीं प्रत्येकाहून अतिव्याप्तीचा आहे हें स्पष्ट दिसतें. यांत व्यवस्थेला सोईचें असें कांहीं नाहीं. म्हणून मोरोपंत गट हा एक ढिगारा होऊन राहील.

कोलन भाषेची विपुलता आणि प्रत्येक लेखक, त्याचा प्रत्येक ग्रंथ व त्याच्यासंबंधींचा प्रत्येक ग्रंथ यांचा पृथक् निर्देश करणारा कोलन क्रमांक देण्याची त्या भाषेची शक्ति हीं पुढल्या प्रकरणांत दिसतील.

त्याअगोदर आपण हें ध्यानांत घेतलें पाहिजे कीं डयूईची मनाई असतांही आपण कालखंड स्पष्ट ठरवून डेसिमल भाषेंत सुधारणा करण्याची व त्या कालखंडांत पृथक् निर्देश करतां येणारे

८ कवी निवडण्याची मुभा घेतली आहे. कोणत्याही वर्गवारीकाराला ही मुभा नाहीं. पद्धतिकाराचे हातून ह्या गोष्टी होऊन येईपर्यंत वर्गवारीकारानें थांबणें जरूर आहे. पण सत्तर वर्षें लोटलीं तरीही मराठींतील ललित वाङ्मयाशीं हा पद्धतिकार अद्यापि आलेला नाहीं. तयार वर्गांक देणाऱ्या पद्धतींत हें वैगुण्य रहातेंच. या प्रकारच्या पद्धतींत पद्धतिकार हा आपल्या कार्यांत वर्गवारीकाराचें सहकार्य मान्य करीत नाहीं. यामुळें वर्गवारीकाराच्या कामांत स्वतंत्र बुद्धीचें नांवही राहत नाहीं आणि त्यांतील आनंदही नाहींसा होतो. तें सर्वथा जडता आणि निरुत्साह आणणारें ठरतें. यानें वर्गवारीकाराच्या व्यक्तित्वाला अपाय होतो आणि तो अनेक उदाहरणांनीं वर दाखविलेल्या वेगवेगळ्या स्थळींच्या डेसिमल भाषेच्या तुटपुंजेपणाइतकाच हानिकारक आहे.

प्रकरण ५ वें

उपयोगी वर्गवारी

आतां आपण कोलन-पद्धतीप्रमाणें मराठींतील ललित वाङ्मयाला उपयोगी होईल अशी वर्गवारी करून पाहूं. **कोलन वर्गीकरण-पद्धति** या पुस्तकांत पहिल्या भागांत व्याकरण व दुसऱ्या भागांत शब्दकोश दिलेला आहे. त्यांचे पुढील भागांतून जेथें जेथें 'नियम' आणि 'कोष्टकें' असा निर्देश आला आहे तो अनुक्रमानें या दोन भागांचा आहे.

५.१ पहिली गोष्ट

[१]पहिल्या प्रकरणांतील कोष्टकावर नजर टाकिली तर ललित

१ Colon Classification या पुस्तकांतील.

वाङ्मयाचे कोलन भाषेंतील समीकरण इंग्रजी अक्षर ओ O व मराठी द आहे असें दिसतें[१]. ' प्रकरण ७ ' मधील पहिले कांहीं नियम आणि 'O प्रकरणां 'तील कोष्टकाच्या शिरोभागीं दिलेल्या विषयाच्या बाजू किंवा लक्षणसूत्र यांचा आपणांस ' ललित वाङ्मय ' या मूळ वर्गांतील कोणत्याही विवक्षित विषयाचें पृथक्करण करून त्याचे मूळ सांकेतिक घटक शोधून काढण्यांत उपयोग होतो. त्याचें लक्षणसूत्र असें—

O(L): (F) (A) : (W)

म्हणजेच द (भाषा): (प्रकार) (लेखक) : (ग्रंथ)

' प्रकरण ३ ' मधील भाषाकोष्टक पाहिलें तर मराठी ललित वाङ्मय याचें कोलन भाषेंतील समीकरण ' द १५५ ' असें ठरतें. ' प्रकरण O ' मधील प्रकारांचें कोष्टक पाहिलें तर आपणांस पुढील-प्रमाणें कोलन भाषेंतील समीकरणें मिळतात—

द १५५ : १ मराठी काव्य
द १५५ : २ मराठी नाटक
द १५५ : ३ मराठी कथा
द १५५ : ६ मराठी गद्य

नियम ६१ वाक्यरचनेचा नियम म्हणून देतो कीं भाषा ही बाजू (१५५) आणि प्रकार हें स्वरूप (१ किंवा २ किंवा ३ किंवा ६ यांपैकीं जो असेल तो) हीं दोन्हीं ' : ' या म्हणजे कोलन चिन्हानें जोडावींत. विषयाच्या स्वरूपासंबंधींचें सूत्रही हेंच दर्शवितें. येथें भाषांक लिहिण्याची जरूरी नाहीं आणि ज्या ग्रंथालयाची व्यवहारांतील भाषा मराठीच असेल तेथें तो अध्याहृत

---

१ यापुढें मराठी प्रतिवर्ण घेऊं.

समजावा, असें नियम ७१०२ सांगतो. अशा ग्रंथालयांतून आपण पुढीलप्रमाणें सुटसुटीतसे कोलन क्रमांक करूं शकतों—

द : १   मराठी कविता
द : २   ,, नाटक
द : ३   ,, कथा
द : ६   ,, गद्य

५२ पुढची पायरी

लेखकाचे नांवाऐवजीं त्याचें जन्मवर्ष लिहावें असें ७३०१ हा नियम सांगतो. ५ वें कोष्टक व ५ व्या कोष्टकाचे नियम जन्मवर्षाचे कोलन क्रमांकांत रूपांतर कसें करावें हें दाखवितात. शेवटीं ७४०१ हा नियम पुस्तकाच्या नांवाचें कोलन भाषेंत रूपांतर करण्याची कृति सांगतो. मराठी ललित वाङ्मयांतील पुस्तकाच्या नांवाचें भाषांतर करण्याच्या रीतींत कोणकोणत्या पायऱ्या असतात तें पाहूं व त्यांचा त्यांचा परिणाम काय होतो तें दिसण्याकरितां उदाहरणें घेऊं. "ग्रंथवर्गीकरणाचीं मूलतत्त्वें व पद्धति" या पुस्तकांतील २२२८ हा नियम ही रीत दाखवितो—

उदा. १ ओक (वामन दाजी) पद्यरत्नमाला.

१. द

२. O (L) : (F) (A) : (W)

३. द (भाषा) : (प्रकार) (लेखक) : (ग्रंथ)

४. द (मराठी) : (कविता) (वा. दा. ओक) : (पद्यरत्नमाला)

५. द (मराठी) : (कविता) (१८४५) : (पहिली कविता)

६. द१५५ : १ण४५ : १

ज्या ग्रंथालयाची व्यवहारांतील भाषाच मराठी असेल तेथें हेंच रूप सुटसुटीत करतां येईल. तें असें—

द: १ण४५ : १

वा. दा. ओकांच्या पुढील मराठी कवितांच्या पुस्तकांचे क्रमांक याचप्रमाणें बनवितां येतील. ते असे—

उदा. २. द : १ण४५:२ वा. दा. ओक. गणपतिनिधनविलाप

उदा. ३. द : १ण४५ : ३ वा. दा. ओक. माधवनिधन

उदा. ४. द : १ण४५ : ४ वा. दा. ओक. कृष्णाकुमारी

उदा. ५. द : कानिटकर (नारायण बापूजी) तरुणी-शिक्षण नाटिका

१. द

२. O (L) : (F) (A) : (W)

३. द (भाषा) : (प्रकार) (लेखक) : (ग्रंथ)

४. द (मराठी): (नाटक) (ना. बा. कानिटकर) : (तरुणी-शिक्षण नाटिका)

५. द (व्यवहारांतील भाषा):(नाटक)(१८५२):(चवथें नाटक)

६. द : २ण५२ : १४

ना. बा. कानिटकरांनीं १२ नाटकें लिहिलीं आहेत हें आपण लक्षांत घेतलें पाहिजे. त्यांच्या नाटकांची संख्या ८ हून जास्त असल्यामुळें दोन अंकांच्या तत्त्वावर ग्रंथांक तयार केला पाहिजे. आठ-आठच्या दोन गटांत हीं नाटकें विभागावयाचीं. पहिल्यानें गटाचा क्रमांक लिहून मग त्या गटांतील नाटकाचा क्रमांक लिहावा. या उदाहरणांतील नाटक चवथें आहे. तेव्हां त्याचा ग्रंथांक १४ हा आहे.

उदा. ६ साने (गीता जनार्दन) लतिका.

१. द

२. O (L) : (F) (A) : (W)

३. द (भाषा) : (प्रकार) (लेखक) : (ग्रंथ)

४. द (मराठी) : (कथा) (गी. ज. साने) : (लतिका)

५. द (व्यवहारांतील भाषा):(कथा)(१९०७):(तिसरी कादंबरी)

६. द : ३ त०७ : ३

५३ निरपवाद समव्याप्ति

कोणत्याही गत, वर्तमान वा भावी लेखकाचा व्यक्तिनिर्देश स्पष्टपणें करतां येतो हें दाखविण्यास वरील उदाहरणें पुरेत. हा कोलन क्रमांक अगदीं ठळकपणानें कोणत्याही वर्गवारीकाराला बनवितां येतो. आणि पद्धतिकाराचे हातून तो बनून येईपर्यंत त्याला थांबावें लागत नाहीं. प्रत्येक लेखकाच्या पुस्तकांचाही पृथक् निर्देश करतां येतो. सर्वच गोष्टींत कोलन क्रमांक अचूकपणें समव्याप्तीचा होतो. आणि तो तयार दिला जात नाहीं. उदाहरणांत दिल्याप्रमाणें पृथक्करण व भाषांतर यांच्या रीतीबरहुकूम तो बनवावयाचा असतो.

प्रकरण ६ वें

लेखक वा पुस्तक यांचेसंबंधींचे ग्रंथ

६१ अनुजीवक पुस्तकें

कोलन-पद्धतीची धांव याहीपुढें आहे. एखाद्या लेखकावर वा त्याच्या एखाद्या पुस्तकावर आधारसूचि, शब्दसूचि, चरित्र, संग्रह,

वेंचे, टीका असे ग्रंथ होतात. अशास आपण 'अनुजीवक ग्रंथ' असें नांव देऊं या. अशा विविध तऱ्हेच्या ग्रंथांना समन्यासीचे व स्वतंत्र वर्गांक कोलन-पद्धति देते. वर विभाग ४३ च्या शेवटीं दाखविल्याप्रमाणें हें डेसिमल-पद्धतीच्या शक्तीपलीकडचें आहे.

६२ द्वितीय अंग

या अनुजीवक ग्रंथांच्या वर्गवारीची रीत "ग्रंथवर्गीकरणाचीं मूल तत्त्वें आणि पद्धति" या ग्रंथाच्या 'भाग ३ अंगांचें पृथकरण' यांत दिली आहे.

पुस्तकाचा विषय असलेला लेखक वा त्याचें एखादें पुस्तक यांपैकीं जो विषय असेल त्याचा पृथक् निर्देश होण्याइतका वर्गांक तयार करावा लागतो. विषयास अनुलक्षून आपण या वर्गांकास प्रथमांग असें म्हणूं. ग्रंथाच्या अनुजीवक स्वरूपाशीं हा वर्गांक समन्यासीचा व्हावा म्हणून तो आणखी वाढतो. या नवीन वाढीस आपण द्वितीयांग असें म्हणूं. कोलन वर्गीकरण-पद्धति या ग्रंथांतील नियमांचें २ रें प्रकरण आणि सर्वसामान्य उपांगें या नांवाचें २ रें कोष्टक हीं वर्गांकाचें हें द्वितीयांग दर्शविण्याकरितां तयार केलीं आहेत.

६३ उदाहरणें

या पद्धतीचा सर्व तपशील येथें दिला तर हें प्रकरण फार विस्तृत होईल. म्हणून येथें कांहीं उदाहरणें घेऊन हें विवेचन येथेंच पुरें करूं. कोणत्याही विवक्षित लेखकासंबंधींचीं ग्रंथालयांत असलेलीं साधनें वाचकांसमोर ठेवण्यांत वर्गीकरण-पद्धतींतील या द्वितीयांगाचा केवढा उपयोग आहे हें उदाहरणांनीं उघड होईल. पुढील उदाहरणांत विवक्षित विषय कोलन-पद्धतीच्या वर्गांकाच्या

अनुक्रमानें दिले आहेत. आणि ह्या अनुक्रमामुळें नात्यानुसारी व्यवस्था किती सार्थ झाली आहे हेंही दिसून येईल.

उदा. द:१ढ२९कं ण८०मोरोपंतासंबंधीं १८८०पर्यंतची ग्रंथसूचि
द:१ढ२९कं त१० ,, १९१० ,, ,,
द:१ढ२९कं त५० ,, १९५० ,, ,,
द:१ढ२९चं मोरोपंतांच्या कवितांच्या प्रथम चरणांची सूचि
द:१ढ२९दं मोरोपंतीय शब्दसूचि
द:१ढ२९वं मोरोपंत चरित्र व पत्रें
द:१ढ२९शं मोरोपंती वेच्यांचे संग्रह
द:१ढ२९हं मोरोपंतांचीं विडंबनें
द:१ढ२९:९ मोरोपंतावरील टीका
द:१ढ२९:९०न मोरोपंताची भाषा
द:१ढ२९:९०न:५०१५मोरोपंतानें उपयोगिलेले संस्कृत शब्द
द:१ढ२९:९०फ मोरोपंताचें तत्त्वज्ञान

शेवटच्या तीन वर्गांकांत आणखी एक म्हणजे तिसरें अंग उपस्थित झालें आहे. शेवटचें उदाहरण पहा. " द: १ ढ २९ " हें प्रथमांग. " ९ " हे द्वितीयांग. " फ " हें तृतीयांग होय आणि तें आधींच्या अंगाशीं O या दुव्यानें जोडलें गेलें आहे. असें हें दुवा म्हणून " O " हे चिन्ह घेणारें अंग म्हणजे विशेषांग होय.

कोलन भाषेच्या भांडारांत विषयाचे पैलू आणि अंगें या दोन संकेतांनीं फार मोठी भर टाकली आहे. यांचेमुळेंच कोलन-पद्धतीनुसार कोणत्याही विवक्षित विषयाशीं समव्याप्तीचे वर्गांक तयार होतात आणि म्हणून कितीही सूक्ष्म व्याप्तीचा विवक्षित विषय असला तरी त्याचा पृथक् निर्देश होऊं शकतो. त्यांच्यामुळेंच कोलन-

पद्धतीचीं कोष्टकें इतकीं सुटसुटीत झालीं आहेत आणि तरीही कोणत्याही विवक्षित विषयाचा पृथक् निर्देश करण्याची शक्ति त्यांचे ठायीं आली आहे. डेसिमल-पद्धतीच्या शक्तीपलीकडची ही गोष्ट आहे. आणि तीच कोलन-पद्धतीनें नेमकी सिद्ध केली आहे.

पैलू आणि अंगें यांचेही आधींचा अधिक मूलगामी असा आणखीही एक संकेत आहे. तो हा कीं वर्गीकरण म्हणजे विशिष्ट चिन्हांकित भाषेंत केलेलें भाषांतर. ही भाषा विवक्षित विषयांचा पृथक् निर्देश होण्याकरितां क्रमदर्शक अंक मुद्दाम तयार करते आणि यांचे योगानें त्या विषयांची नात्यानुसारी स्थानव्यवस्था सुरळित होते. या संकेतामुळें वर्गीकारांना स्वतंत्र कर्तृत्व दाखवितां येतें. कोणताही नवा लेखक किंवा त्याचे ग्रंथ किंवा त्याचेसंबंधींचे ग्रंथ यांचें वर्गीकरण पद्धतिकाराकडून होऊन येईपर्यंत कोलन-वर्गवारी-काराला अडून बसावयास नको.

प्रकरण ७ वें

प्रतअंक (Book Number)

७१ प्रतअंक आणि स्थानांक (Call Number)

ग्रंथांची स्थानव्यवस्था सुरळित करणाऱ्या वर्गांकांत विवक्षित विषयांचें भाषांतर करणें हा ग्रंथवर्गीकरणांतील फक्त अर्धा कार्यभाग आहे. यानें ग्रंथांचे अनेक गट बनतील आणि त्या गटांची व्यवस्था ठरेल एवढेंच. विशिष्ट गटांतील ग्रंथांची व्यवस्था कशी करावयाची हा प्रश्न राहातोच. त्यांची व्यवस्थाही सोईवार झाली पाहिजे. आणि म्हणून ती सुयंत्र ठरविणें जरूर आहे. याकरितां आणखी एका

क्रमांकाचा उपयोग केला जातो. त्याला ' प्रतअंक ' असें म्हणतात. पुस्तकांच्या कडेवर वर्गांकाच्या खालीं प्रतअंक लिहावा. वर्गीकृत सूचींत आणि इतर सर्व प्रकारच्या सूचींत वर्गांकापुढें दोन अक्षरांची जागा सोडून त्याचाच एक भाग म्हणून प्रतअंक लिहिला जातो. **वर्गांक** आणि **प्रतअंक** यांच्या जोडगोळीलाच **स्थानांक** म्हणतात.

७२ कोलन-पद्धतीचा प्रतअंक

कोलन-पद्धतीनुसार प्रतअंक बनवितांना ते वर्गांकाचेच पोटभाग म्हणून राहावेत असे नियम दिले आहेत. डेसिमल-पद्धतींत ही सोय नाहीं. कोलन-प्रतअंकानें पुढील गोष्टी साधतात—

(१) एकाच विवक्षित विषयांतील पुस्तकें भाषावार गटांनीं वेगवेगळीं होतात.

(२) अगदीं नुकतींच मुद्रित झालेलीं पुस्तकें त्या त्या गटाच्या टोंकाला एकत्र यावींत म्हणून प्रत्येक भाषावार गटांतील पुस्तकें त्यांच्या त्यांच्या प्रकाशनाच्या वर्षानुक्रमानें लावलीं जातात.

(३) अनेक खंडांच्या पुस्तकांचे निरनिराळे खंड योग्य क्रमानें एकत्र येतात.

तेव्हां प्रतअंकांत भाषावयव, वर्षावयव आणि खंडावयव हे अवयव क्रमानें असूं शकतील. प्रकरण ४ मधील भाषाकोष्टकाच्या साहाय्यानें भाषेच्या नांवाचें भाषांतर करून आपणास भाषावयव मिळतो. वर्षावयवाचें भाषांतर पुढील कोष्टकाच्या साहाय्यानें करतां येतें—

खिस्तपूर्व	२००० पूर्वी	क	
,,	१९९९ ते १०००पर्यंत	ख	
,,	९९९ ते आरंभ	ग	
खिस्तशक	१ ते ९९९	घ	
	१००० ते १०९९	च	
	११०० ते ११९९	छ	
	१२०० ते १२९९	ज	
खिस्तशक	१३०० ते १३९९	झ	
	१४०० ते १४९९	ट	
	१५०० ते १५९९	ठ	
	१६०० ते १६९९	ड	
	१७०० ते १७९९	ढ	
	१८०० ते १८९९	ण	
	१९०० ते १९९९	त	

वरीलपैकीं क, ख, ग, घ खेरीज सर्व अक्षरें प्रत्येकीं एक शतक दाखवितात. त्या त्या शतकाच्या अक्षरानंतर त्या वर्षाचा आंकडा लिहिला कीं वर्ष आलें. यावरून ण ९२ = १८९२; त०० = १९००; त ४४ = १९४४. १९४४ तील एखाद्या ग्रंथाचा पहिला खंड म्हणजे त४४·१. दुसरा खंड म्हणजे त४४·२. या-प्रमाणेंच पुढेंही.

मराठी ललित वाङ्मयांतील जे ग्रंथ मराठींतच मुद्रित झालेले असतील त्यांवर भाषावयव लिहिण्याची कांहींही गरज नाहीं आणि भाषावयव नसलेला प्रतअंक भाषावयव असलेल्या प्रतअंकाचे आधीं ठेवला जाईल.

७३२ उदाहरणें

उदा. १.	द:१ड०८शं	त०१	तुकाराम अभंगांची गाथा.	१९०१	पुणें
	द:१ड०७शं	त०२	,, ,,	.१९०२	,,
	द:१ड०८शं	त०३	,, ,,	.१९०३	मुंबई
	द:१ड०८शं	त०५	,, ,,	.१९०५	पुणें
	द:१ड०८शं	त०८	,, ,,	.१९०८	,,
	द:१ड०८शं १११	त०९	,, ,,	.	The

poems translated & rearranged with notes & introduction by G. Nelson Frazer & K. B. Marathe. १९०९. मद्रास.

येथें प्रतअंक लिहितांना वर्षावयवापूर्वीं १११ हा भाषावयव जोडल्यामुळें मूळ मराठी आवृत्त्यांतून इंग्रजी भाषांतर कसें अलग झालें आहे हें पाहण्यासारखें आहे.

उदा. २. द:१ड०९वं त०९ आठल्ये (कृष्णाजी नारायण). रामदासस्वामींचें समग्र चरित्र. १९०३ मुंबई)

द:१ड०९वं त०७ देव (शंकर श्रीकृष्ण). संपा. समर्थांचीं दोन जुनीं चरित्रें. १९०७. धुळें.

द:१ड०९वं त१० ,, आवृति २ री. १९१०. धुळें.

द:१ड०९वं त१०१ हनुमंतस्वामी-समर्थ रामदास-स्वामी. १९१०. मुंबई.

द:१ड०९वं त१३ आत्माराम. दशविश्रामधाम. १९१३. धुळें.

येथें प्रतअंकांचा उपयोग केल्यामुळें—

(१) रामदास स्वामींचीं निरनिराळीं चरित्रें प्रकाशनाच्या वर्षवारीनें कशीं एकत्र लागलीं आहेत हें आणि

(२) १९१० ह्या एकाच वर्षांत प्रकाशित झालेलीं दोन वेगवेगळीं चरित्रें कशीं अलग झालीं आहेत हें पाहण्यासारखें आहे.

उदा.३. द:१ड१५शं ण७८·१–ण७८·३ वामनपंडित. प्रकरणें ३ खं.१८७८.पुणें.

द:१ड१५शं ण८९·१–ण८९·४ वामनपंडित. ग्रंथ. ४ खं. १८८९-१८९१. मुंबई.

द:१ड१५शं ण९४·१–ण९४·३ वामनपंडित.कविता-संग्रह. ३ खं. १८९४-१९०१.मुंबई.

येथें प्रतअंकांत खंडावयव समाविष्ट केल्यामुळें एकाच आवृत्तीचे निरनिराळे खंड कसे अलग झाले आहेत हें पाहण्यासारखें आहे.

प्रकरण ८ वें

तयार वर्गांक व स्थानांकांची सुद्दाम बनविलेली १७५ उदाहरणांची नमुन्याची यादी

८१ सूचना

सूचना १ ली—उदाहरणें ३ ते १४ आणि शेवटचीं सहा प्रत्यक्ष पुस्तकांचीं आहेत. हीं स्थानांकांचीं, म्हणजे वर्गांक + प्रत-अंकांचीं उदाहरणें आहेत.

सूचना २ री—उरलेल्या १५७ उदाहरणांत फक्त वर्गांकांची यादी दिली आहे. हे वर्गांक १३३ लेखक, त्यांच्यापैकींच एकाचीं २२ पुस्तकें आणि २ कालिकें यांचे आहेत.

सूचना ३ री—ज्या ग्रंथालयांत व्यवहारांतील भाषा मराठी आहे अशाकरितांच हे वर्गांक आहेत.

इतर ग्रंथालयांत मराठीचा १५५ हा भाषांक द आणि : (कोलन चिन्ह) यांच्यामध्यें घालावा लागेल.

सूचना ४ थी—कादंबरीकार हरि नारायण आपटे यांच्या उदाहरणांत त्यांच्या प्रत्येक कादंबरीचा वर्गांक दिला आहे. ज्या लेखकांचे ग्रंथ ८ हून जास्त आहेत अशांच्या वर्गांकांत ग्रंथांक कसा उपयोगावा हें दाखविण्याकरितां हे वर्गांक दिले आहेत.

सूचना ५ वी—प्रत्येक वर्गांकापूर्वी दशांशचिन्ह आहे असें समजावें. म्हणजे कोणत्याही वर्गांकांतील चिन्हांचीं स्थानमूल्यें दशांश अपूर्णांकांप्रमाणें आहेत हें लक्षांत येईल.

सूचना ६ वी—ह्या चिन्हांचीं स्थानमूल्यें अशीं निर्णीत करून टाकलीं आहेत कीं तीं पुढें दिलेल्या चढत्या क्रमानें येतात—
a, b, ... y, z, O, :, १, २, ... ८, ९, A, B, ...Y, Z.
शिवाय एक संकेत असा आहे कीं अनुनासिकानें पूर्ण असलेला वर्गांक अनुनासिक नसलेल्या वर्गांकाचे आधीं यावा.

पुढील उदाहरणांत वर्गांक किंवा स्थानांक जें असेल तें त्यांच्या अनुक्रमानें दिलेलें आहे.

द: मराठी ललित वाङ्मय.

द:णं ललित कालिकें.

द:णंर:तर७ महाराष्ट्र साहित्य-पत्रिका (१९२७त सुरू झालेलें).

द:णंर:त४३ अभिरुचि (१९४३ त सुरू झालेलें).

द:लं ललित वाङ्मयाचा इतिहास.

द:लंर:ण०० त०० भावे (विनायक लक्ष्मण). महाराष्ट्र सारस्वत. १९००.

द:लं२:त०० त०६ ओक (विनायक कोंडदेव). महाराष्ट्र वाङ्मय. १९०६.

द:लं२:ण८० त३९ सरदार (गंगाधर बाळकृष्ण). अर्वाचीन मराठी गद्याची पूर्वपीठिका. १९३९.

द:लं२:त२० १११त२१ नाडकर्णी (मंगेश कमलाकर). शॉर्ट हिस्टरी ऑफ् मराठी लिटरेचर. १९२१.

द:शं वेंचे, संग्रह.

द:शं०फ४ त२८ किर्लोस्कर (शंकर वासुदेव). मानसिक गुटिका. १९२८.

द:शंत२० त३२ भिडे (ना. म.) आणि देव (ना. वि.). संपा. साहित्य तोरण. १९३२.

द:१ कविता.

द:१शंत२० त२४ पोतदार (गोपाळ गंगाधर). काव्य-कौमुदी. १९२४.

द:१शंड७० १११त२९ मॅक्निकल (निकल). अनु. साम्स ऑफ मराठी सेंट्स. १९२९.

द:१:९ काव्यसमीक्षा, टीका.

द:१:९ त२१ पटवर्धन (वासुदेव बळवंत). काव्य आणि काव्योदय. १९२१.

द:१:९ त३० जोग (रामचंद्र श्रीपाद). अभिनव काव्य-प्रकाश. १९३०.

द:१:९ त३१ केळकर (दत्तात्रय केशव). काव्यालोचन. १९३१.

द:१:९०न तइ७ पटवर्धन (माधव त्र्यंबक). छंदोरचना. १९३७.

द:१ मराठी कवी आणि काव्य.

आरंभकाल

द:१ज५० मुकुंदराज.
द:१ज७१ ज्ञानेश्वर.
द:१ज७५ नामदेव.

मध्ययुगीन काल

द:१ठ४८ एकनाथ.
द:१ठ५१ दासोपंत
द:१ठ६० रघुनाथस्वामी
द:१ठ७० आनंदतनय
द:१ठ८० रघुनाथ पंडित

शिवकाल

द:१ड०८ तुकाराम
द:१ड०९ रामदास
द:१ड१० मुक्तेश्वर
द:१ड१५ वामनपंडित
द:१ड७८ श्रीधर
द:१ड८० मध्वमुनी

ब्रिटिशपूर्व काल

द:१ड९८ अमृतराय
द:१ढ१४ सोहिरोबा
द:१ढ१५ महीपति

द: १ढ२९ मोरोपंत
द: १ढ४४ अनंतफंदी
द: १ढ५५ प्रभाकर
द: १ढ६२ रामजोशी

व्हिक्टोरिआ राणीचा काळ

द: १ढ९८ हंसराजस्वामी
द: १ण१३ विठोबा अण्णा दप्तरदार
द: १ण२४ कृष्णशास्त्री हरि चिपळूणकर
द: १ण३५ महादेव मोरेश्वर कुंटे
द: १ण३८ बजाबा रामचंद्र प्रधान
द: १ण३८१ केशव सदाशिव रिसबूड
द: १ण३८२ गणपतराव हरिहर पटवर्धन
द: १ण४१ विनायक कोंडदेव ओक
द: १ण४४ पांडुरंग गोविंदशास्त्री पारखी
द: १ण४५ वामन दाजी ओक
द: १ण५० शिवराम रामकृष्ण निजसुरे
द: १ण५११ विठ्ठल भगवंत लेंभे
द: १ण५१२ पांडुरंग व्यंकटेश चिंतामणि पेटकर
द: १ण५४ गोविंद वासुदेव कानिटकर
द: १ण५६ पुरुषोत्तम बाळकृष्ण जोशी
द: १ण५७ गंगाधर रामचंद्र मोगरे
द: १ण५८ वासुदेव वामन खरे
द: १ण६१ विद्याधर वामन भिडे
द: १ण६३ एकनाथ गणेश भांडारे

द:१ण६४	महादेव हरि मोडक
द:१ण६५	कृष्णाजी केशव दामले

अर्वाचीन काल

द:१ण७१	चंद्रशेखर शिवराम गोऱ्हे
द:१ण७२	नरसिंह चिंतामण केळकर
द:१ण८३	विनायक दामोदर सावरकर
द:१ण८३१	साधुदास. टोपण. (म्ह. गोपाळ गोविंद मुजुमदार)
द:१ण८५२	गोविंदाग्रज. टोपण. (म्ह. राम गणेश गडकरी)
द:१ण८७	अेकनाथ पांडुरंग रेंदाळकर
द:१ण९०	नारायण केशव बेहरे
द:१ण९०१	बालकवि. टोपण. (म्ह. त्रिंबक बापूजी ठोमरे)
द:१ण९३	गिरीश. टोपण. ((म्ह. शंकर केशव कानेटकर)
द:१ण९४	वासुदेव गोविंद मायदेव
द:१ण९५	काव्यविहारी. टोपण. (म्ह. धोंडो वासुदेव गद्रे)
द:१ण९८	केशवकुमार. टोपण. (म्ह. प्रल्हाद केशव अत्रे)
द:१ण९९	अज्ञातवासी.टोपण.(म्ह. दिनकर गंगाधर केळकर)
द:१ण९९१	यशवंत. टोपण. (म्ह. यशवंत दिनकर पेंढरकर)
द:१त०१	अनिल. टोपण. (म्ह. आत्माराम रावजी देशपांडे)
द:१त०३	निशिगंध. टोपण. (म्ह. रामचंद्र श्रीपाद जोग)
द:१त०४	अनंत आत्माराम काणेकर
द:१त२१	रामचंद्र नारायण नातू

द:२ नाटक

व्हिक्टोरिया राणीचा काळ

द:२ण१८	विष्णु अमृत भावे

द:२ण२२ महादेव गोविंद कोल्हटकर
द:२ण२५ गणेश सदाशिव लेले
द:२ण३५ सोकर बापूजी त्रिलोकेकर
द:२ण३८ बजाबा रामचंद्र प्रधान
द:२ण४० काशीनाथ गोविंद नातू
द:२ण४०१ विनायक जनार्दन कीर्तने
द:२ण४१ आण्णा मार्तंड जोशी
द:२ण४३ बळवंत पांडुरंग किर्लोस्कर
द:२ण४७ कृष्णाजी परशुराम गाडगीळ
द:२ण५० शंकर मोरो रानडे
द:२ण५१ विष्णु मोरेश्वर महाजनी
द:२ण५११ विठ्ठल भगवंत लेंभे
द:२ण५२ नारायण बापूजी कानिटकर
द:२ण५४ वासुदेव नारायण डोंगरे
द:२ण५५ गोविंद बल्लाळ देवल
द:२ण६२ महादेव नारायण पाटणकर

अर्वाचीन काळ

द:२ण७१ श्रीपाद कृष्ण कोल्हटकर
द:२ण७२ नरसिंह चिंतामण केळकर
द:२ण७६ यशवंत नारायण टिपणीस
द:२ण८५ भार्गवराम विठ्ठल वरेरकर
द:२ण८५१ महादेव नारायण जोशी
द:२ण८५२ राम गणेश गडकरी
द:२ण८६ गिरिजाबाई केळकर

द:३ कथा

व्हिक्टोरिआ राणीचा काळ

द:३ण६४:२१ मायेचा बाजार
द:३ण६४:२२ वज्राघात
द:३ण६४:२३ यशवंतराव खरे
द:३ण६४:२४ मी
द:३ण६४:२५ सूर्योदय
द:३ण६४:२६ केवळ स्वराज्यासाठीं
द:३ण६४:२७ गणपतराव
द:३ण६४:२८ भयंकर दिव्य
द:३ण६४:३१ कर्मयोग
द:३ण६४:३२ आजच
द:३ण६४:३३ म्हैसूरचा वाघ
द:३ण६४:३४ कालकूट
द:३ण६४:३५ मध्यान्ह
द:३ण६४:३६ सूर्यग्रहण

अर्वाचीन काळ

द:३ण७१ श्रीपाद कृष्ण कोल्हटकर
द:३ण७२ नरसिंह चिंतामण केळकर
द:३ण८२ नाथमाधव. टोपण. (म्ह. द्वारकानाथ माधव पितळे)
द:३ण८३ वामन मल्हार जोशी
द:३ण८५ भार्गवराम विठ्ठल वरेरकर
द:३ण९१ नारायण महादेव पटवर्धन
द:३ण९२ चिंतामण विनायक जोशी
द:३ण९४ नारायण सीताराम फडके
द:३ण९४१ वासुदेव विनायक जोशी

.:३ण९६	रघुनाथ वामन दिघे
द:३ण९८१	विष्णु सखाराम खांडेकर
द:३त००	गजानन त्र्यंबक माडखोलकर
द:३त०१२	यशवंत गोपाळ जोशी
द:३त०६	गंगाधर भाऊराव निरंतर
द:३त०७	गीता जनार्दन साने
द:३त०७१	विष्णु विनायक बोकील

द:६ गद्य

व्हिक्टोरिआ राणीचा काळ

द:६ण२७	विष्णुशास्त्री पंडित
द:६ण४०	गोविंद शंकरशास्त्री बापट
द:६ण४१	विनायक कोंडदेव ओक
द:६ण५०	विष्णु कृष्ण चिपळूणकर
द:६ण५२	गोपाळ गणेश आगरकर
द:६ण५५	मोरो गणेश लोंढे
द:६ण६९	नारायण गोविंद चापेकर

अर्वाचीन काळ

द:६ण७२	नरसिंह चिंतामण केळकर
द:६ण८५	भार्गवराम विठ्ठल वरेरकर
द:६ण८६१	श्रीपाद महादेव माटे
द:६ण९४	नारायण सिताराम फडके
द:६ण९७	विनायक लक्ष्मण बर्वे
द:६ण९८	प्रल्हाद केशव अत्रे
द:६ण९८१	विष्णु सखाराम खांडेकर

द:६त०१३ श्रीपाद रामचंद्र पारसनीस
द:६त०४ अनंत आत्माराम काणेकर
द:६त०४१ पुरुषोत्तम गणेश सहस्रबुद्धे
द:६त०६ गंगाधर भाऊराव निरंतर

द:९ समीक्षा (मूलतत्त्वें)

द:९ त३८ फडके (नारायण सीताराम). प्रतिभासाधन. आवृत्ति २. १९३८.
द:९ त४२ वाटवे (केशव नारायण). रसविमर्श. १९४२.
द:९ त४३ जोग (रामचंद्र श्रीपाद). सौंदर्य शोध आणि आनंदबोध. १९४३.

द:९ समीक्षा (उदाहरण किंवा विवरण)

द९त०० त३७ क्षीरसागर (श्रीकृष्ण केशव). व्यक्ती आणि वाङ्मय. १९३७
द:९त०० त३७१ माडखोलकर (गजानन त्रिंबक). वाङ्मय-विलास. १९३७
द:९त०० त३५ चापेकर (नारायण गोविंद). साहित्यसमीक्षा १९३५

८३ लेखकांच्या नांवांची सूचि

निरंतर	गद्यलेखक	द:६त०६
निशिगंध. टोपण.		द:१त०३
पटवर्धन (गणपतराव हरिहर)		द:१ण३८२
,, (नारायण महादेव		द:३ण९१
पंडित (विष्णुशास्त्री)		द:६ण२७
पाटणकर (महादेव नारायण)		द:२ण६२
पारखी (पांडुरंग गोविंदशास्त्री)	कवि	द:१ण४४
,,	कथालेखक	द:३ण४४
पारसनीस (श्रीपाद रामचंद्र)		द:६त०१३
पितळे (द्वारकानाथ माधव)		द:३ण८२
पेंढरकर (यशवंत दिनकर)		द:१ण९९१
प्रधान (बजाबा रामचंद्र)	कवि	द:१ण३८
,,	नाटककार	द:२ण३८
,,	गद्यलेखक	द:६ण३८
प्रभाकर		द:१ढ५५
फडके (नारायण सीताराम)	नाटककार	द:२ण९४
,,	कथालेखक	द:३ण९४
,,	गद्यलेखक	द:६ण९४
बर्वे (आनंदराव सखाराम)		द:३ण४५
,, (विनायक लक्ष्मण)		द:६ण९७
बापट (गोविंद शंकरशास्त्री)	कथालेखक	द:३ण४०
,,	गद्यलेखक	द.६ण४०
बालकवि. टोपण.		द:१ण९०१
बेहेरे (नारायण केशव)		द:१ण९०

रिसबूड (नारायण सदाशिव)		द:३ण४१
रेंदाळकर (अेकनाथ पांडुरंग)		द:१ण८७
लेंभे (विठ्ठल भगवंत)		द:१ण५११
लेले (गणेश सदाशिव)		द:२ण२५
लोंढे (मोरो गणेश)		द:१ण५५
वरेरकर (भार्गवराम विठ्ठल)	नाटककार	द:२ण८५
,,	कथालेखक	द:३ण८५
,,	गद्यलेखक	द:६ण८५
वामन पंडित		द:१ड१५
श्रीधर		द:१ड०८
सहस्रबुद्धे (पुरुषोत्तम गणेश)	नाटककार	द:२त०४१
,,	कथालेखक	द:३त०४१
साधुदास. टोपण.		द:१ण८३१
साने (गीता जनार्दन)		द:३त०७
सावरकर (विनायक दामोदर)		द:१ण८३
सोहिरोबा		द:१ढ१४
हंसराजस्वामी		द:१ढ९८
ज्ञानेश्वर		द:१ज७१

प्रकरण ९ वें

सारांश

९१ दशांशपद्धतीचें कार्य

मागील प्रकरणांत दिलेली १०५ लेखकांची यादी आणि सूचि ही अर्थात् संपूर्ण नाहीं. ती केवळ नमुन्यापुरती आहे हें ध्यानांत

घेतलें पाहिजे. आजपर्यंत प्रकाशांत आलेल्या लेखकांची संख्या ४००० हून अधिक असावी. परंतु दशांशपद्धतीनुसार २८८ हून जास्त लेखकांना पृथक् स्थानें देतां येत नाहींत. म्हणून उरलेल्या सर्वांस सुमारें ३२ मोठ्या घसघशीतशा वर्गांत अेकत्र टाकावे लागतात.

या ' ज्येष्ठ लेखक ' असें गणले गेलेल्या २८८ चे बाबतींतही त्यांचीं कित्येक पुस्तकें आणि त्या प्रत्येकावरील अनुजीवक पुस्तकें हीं एकत्र टाकावीं लागतील. हा व्यवस्थेचा संपूर्ण विपर्यास होईल.

हा तोटकेपणा असूनही लेखकांच्या दशांशपद्धतीनुसार केलेल्या याद्या १० पेक्षां जास्त पानें व्यापतील.

शिवाय समकालीन लेखकांचीं तसेंच नवोदित होणाऱ्या लेखकांचीं पुस्तकें ग्रंथालयांत आलीं तरी पद्धतिकाराकडून त्यांचे क्रमांक ठरून येईपर्यंत वर्गवारीकारांना त्यांची वर्गवारी करतां येत नाहीं. म्हणजे तीं पुस्तकें उपयोगांत न आणतां बेमुदत नुसतीं ठेवून द्यावीं लागतील.

या सगळ्या गोंधळाचें मूळ हें आहे—दशांशपद्धतीनुसार वर्गवारीकाराला नवीन करावयाला असें कांहींहीं ठेवलेलें नाहीं आणि प्रत्येक लेखकाचा तयार वर्गांक पुरविण्यांत येतो. दशांशकोशांत शब्दांचें भाषांतर दिलेलें नसून वाक्यांचें भाषांतर पुरविलेलें असतें.

९२ कोलन-पद्धतीचें कार्य

कोलन-पद्धति असें करीत नाहीं. वाक्यांतील शब्दांशीं समानार्थक अशा घटक कल्पना योजून त्यांच्या कोष्टकांचा सुटसुटीतसा फक्त एक गट ही पद्धति पुरविते. तीं कोष्टकें अशीं—

मुख्य वर्ग	भूखंड
O = द ललित वाङ्मय	२ हिंदुस्थान
पोटभाग	कालखंड
a = कं सूचि	G = सन १२००–९९=ज
c = गं नामानुक्रमणिका	H = १३००–९९=झ
e = चं प्रथम चरणांची सूचि	I = १४००–९९=ट
k = डं शब्दसूचि	J = १५००–९९=ठ
m = णं कालिक	K = १६००–९९=ड
v = ळं इतिवृत्त, इतिहास	L = १७००–९९=ढ
w = वं चरित्र	M = १८००–९९=ण
x = शं वेंचे, संग्रह	N = १९००–९९=त
z = हं विडंबन	
: ९. टीका	

ललित वाङ्मय—प्रकार

१ काव्य
२ नाट्य
३ कथा
६ गद्य

या सर्वांस एक पानही लागत नाहीं. ‘ कोलन-पद्धति ’ प्रकरणें २, ५, ६ नि ७ यांत दिलेल्या नियमांनुसार हीं चिन्हें जोडावयाचीं असतात. वर्गांक तयार करतांना हे नियम कसे लागू करावयाचे त्याचीं सविस्तर उदाहरणें याच पुस्तकांत प्रकरण ५ व ६ मध्यें दिलीं आहेत.

कोणत्याही दिवंगत, जिवंत किंवा भावी कालांत होणाऱ्या लेखकाचा आणि त्याच्या कोणत्याही पुस्तकाचा वा त्याच्या अनुजीवक पुस्तकाचा कोलन क्रमांक कोणीही वर्गवारीकार कोणत्याही साधार इतिहासावरून किंवा चरित्रकोशावरून किंवा व्यक्तिबोधक कोशावरून तयार करूं शकतो.

या रीतीनें बनविलेले कोलन क्रमांक हे ते दर्शवीत असलेल्या वर्गांशीं संपूर्ण समव्यासीचे होतील आणि कांहींही कोणत्याही घनघशीत वर्गांत टाकावे लागणार नाहींत.

९३ त्याचें महत्त्व

दशांशपद्धतीची यादी म्हणजे जणूं मराठी वाङ्मयाचा व्यक्तिकोशच बनू पाहते आहे अशी तिची गति झाली आहे. आणि त्यांत ती अपुरी ठरली आहे. कोलन-पद्धतीला व्यक्तिकोशाच्या क्षेत्रांत मुळींच शिरावयाचें नाहीं. तिला तो हवा आहे. त्याचें महत्त्व ती मानते आणि त्याचा उपयोग वाढविते. म्हणून वर्गीकारानें कोलन-क्रमांक बनवितांना व्यक्तिकोशाचा उपयोग कसा करावा हें सांगणें एवढेंच मर्यादित काम ही पद्धति करते. कोशांत जर एखादा नवीन समकालीन लेखक आलेला नसेल तर वर्गवारीकार लेखकाला लिहून त्याची जन्मतारीख मिळवूं शकतो.

याचा एक फायदा असा झाला आहे कीं कोलन क्रमांकाच्या यादीची आरंभीं जेवढीं पानें होतीं तेवढींच पुढेंही आहेत. दुसरा फायदा असा झाला आहे कीं, प्रत्येक लेखकास आणि प्रत्येक वाङ्मयीन लेखकास अेकच अेक निश्चित निर्देश प्राप्त झाला आहे. म्हणजे प्रत्येकाचा पृथक् वर्गांक तयार होतो. तिसरा फायदा असा झाला आहे कीं मराठी वाङ्मयांतील कोणत्याही नवीन पुस्तकाचें

वर्गीकरण, त्याचा लेखक अगदीं नवा असला तरीही पद्धतिकाराकडून त्याला देण्याच्या क्रमांकासंबंधीं सूचना आली नाहीं म्हणून, न करतां थांबवावें लागत नाहीं.

या सर्वांहूनही विशेष म्हणजे कोलन-पद्धति वर्गवारीकाराच्या कर्तृत्वशक्तीस मान देते. त्याला स्वतंत्रबुद्धीचा मानव समजते आणि तयार वर्गांकांच्या यादीबरहुकूम क्रमांक नकलण्याच्या यःकश्चित् कामापेक्षां वेगळें स्वतंत्र असें कांहीं करावयास त्याचेकरितां ठेविते. अशा तऱ्हेनें वर्गवारीकारास मिळालेल्या स्वयंकर्तृत्वांत अनेक फायदे आहेत.

समाप्त

I Dec. 47 (½)

मुद्रक—स. रा. सरदेसाई, बी.अे., अेल्अेल्.बी., नवीन समर्थ विद्यालयाचा 'समर्थ भारत' छापखाना, ४१ बुधवार, पुणें २
प्रकाशक—श्री. वि. दामले, बी.कॉम्., अेन्. के. पब्लिशिंग हाअुस, ६२७ बुधवार, पुणें २

ग्रंथपालन या विषयावरील
श्री. वा. पु. कोल्हटकरकृत
आगामी
संदर्भ साह्य
(सुबोध तांत्रिक माहिती)
लवकरच प्रसिद्ध होईल.

KAIKHUSHRU TARAPOREVALA MEMORIAL SERIES IN LIBRARY SCIENCE

1. The Decimal and the Colon Classifications : A summary and a comparison, by R. S. Parkhi, 1945, Cr. 8 vo. Pp. xvi, 147. Rs. 2/4

2. Classification of Marathi Literature, by S. R. Ranganathan, 1945, Cr. 8vo. Pp. 44. Rs. 1/4

3. Reference Service in Libraries, by R. S. Parkhi, 1945, Cr. 8vo. Pp. viii, 91. Rs. 1/8

4. Elements of Library Classification, by S. R. Ranganathan, 1946, Cr. 8vo. Pp. iv, 112. Rs. 2/-

Further titles in the Series to follow.

एन्. के. पब्लिशिंग हाउस
पुणें २